**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५</u>**

माहिती उपलब्ध करून देण्याकरिता घ्यावयाच्या शुल्काबाबत.

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग

शासन परिपत्रक क्रमांक : केमाअ-२००७/प्र.क्र.३४/०७/५

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक : ०९.०५..२००७

पहा :- १) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५

२) महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २००५

**<u>परिपत्रक</u> :**

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत मागणी करण्यात आलेली माहिती उपलब्ध करून देण्याकरिता अर्जदाराकडून घ्यावयाचे शुल्क, "महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २००५" अन्वये विहित करण्यात आलेले आहे. त्यानुसार अर्जदाराकडून घेण्यात आलेली रक्कम तसेच या अधिनियमांतर्गत प्राप्त होणारी रक्कम कोणत्या लेखाशिर्षाखाली जमा करावी व अर्जदारास कोणत्या प्रकारची पावती द्यावी, याबाबतचे मार्गदर्शन करण्याची विनंती विविध कार्यालयांकडून वारंवार करण्यात येत आहे.

२. या अनुषंगाने असा खुलासा करण्यात येतो की, सर्वसाधारणपणे विविध प्रयोजनांसाठी आकारण्यात येणाऱ्या फी च्या रूपाने नागरिकांकडून त्या त्या कार्यालयांकडे भरल्या जाणाऱ्या रकमांसाठी जी पावती दिली जाते तशीच पावती माहिती अधिकारासंदर्भात प्राप्त होणाऱ्या रकमेसाठी सुद्धा दिली जाणे अपेक्षित आहे. अशा कार्यालयांनी ही जमा होणारी रक्कम ००७, इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६-१) या अर्थसंकल्पीय लेखाशीर्षाखाली जमा करणे अपेक्षित आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २००७०५०८१११४५९००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(ज.व.दिवाण)

शासनाचे सह सचिव

प्रत,

१) राज्यपालांचे सचिव,
२) मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३) उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,
४) सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
५) मुख्य सचिव,
६) शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव /सचिव,
*७) प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई,
*८) प्रबंधक, उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई,
*९) प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई,
*१०) प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, मुंबई,
*११) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
*१२) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई,
१३) राज्य माहिती आयोग (१० प्रती)
१४) सर्व राज्य माहिती आयुक्त
१५) सर्व विभागीय आयुक्त,
१६) सर्व जिल्हाधिकारी / जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, / १७) सर्व महानगरपालिकांचे आयुक्त
१८) सर्व मंत्रालयीन विभाग,
१९) मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील सर्व विभाग / कार्यालय प्रमुख,
२०)सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
२१) निवड नस्ती. (२ प्रती) * (पत्राने)

F:\vijay\G.R.\62